# ८ - कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करुन घेणा-या लाभार्थीना मोबदला.

वाढत्या लोकसंख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाकडुन वेळोवेळी अनेक योजना व उपाययोजना करण्यैंत येतात त्याचाच एङ्क भाग म्हणून कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करुन घेणा-या व्यक्तींना त्यांच्या मजुरीची नुकसान भरपाई म्हणून रोख मोबदला व शस्त्रक्रियेच्या अनुषंगाने करावयाच्या खर्चासाठी प्रोत्साहनात्मक अनुदान देण्याची योजना चालु केलेली आहे. शासन निर्णय दि. १३ डिसेंबर २००७ नुसार लाभार्थीना मिळणा-या तसेच इतर अनुज्ञेय बाबीवरील अनुज्ञेय खर्चाचे विवरण पत्र खालील प्रमाणे आहे.

### अ) शासकिय आरोग्य संस्थेत कुंटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्यावर द्यावयाचे लाभ ( रु.)

| **खर्चाची बाब** | **पुरुष नसबंदी (सर्व लाभा-र्थ्यांसाठी )** | **स्त्री नसबंदी (फक्त बीपीएल/ एससी/एसटी लाभार्थ्यांसाठी)** | **स्त्री नसबंदी (दारिद्र रेषे वरील लाभार्थ्यांसाठी)** | **शेरा** |
|---|---|---|---|---|
| लाभार्थ्यांना मोबदला | ११०० | ६५० | २५० | |
| प्रवृत्त करणा-यांसाठी | २०० | १५० | १५० | |
| औषधी व मलमपट्टी | ५० | १०० | १०० | जिल्हा स्तरावर खर्च |
| तज्ञाची फी | १०० | ७५ | ७५ | |
| भुलतज्ञाची फी | - | २५ | २५ | |
| स्टाफ नर्स/ परिचारिका | १५ | १५ | १५ | |
| ओटी तंत्रज्ञ / मदतनीस | १५ | १५ | १५ | |
| श्रमपरिहार | १० | १० | १० | |
| शिबीर व्यवस्थापन | १० | १० | १० | |
| **एकुण** | **१५००** | **१००** | **६५०** | |

**टिप :-** १. पुरुष नसबंदी करुन घेणा-या लाभार्थ्यांना वरिल मोबदल्याव्यतिरक्त राज्य शासनाकडुन रु. ३५१ देय राहील.